महाराष्ट्र शासन
इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
**कार्यालय, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्रं. ७१२-२८७०१२०/२१ CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

# महाज्योती नागपूर प्रायोजित व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ आयोजित महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण योजना

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांच्या उत्पादित मालाला शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करणे हि शेती क्षेत्रापुढील जटील समस्या आहे. याकरिता शेतकऱ्यांना शास्त्रोक्त पद्धतीचे मार्गदर्शन व त्याआधारे निविष्ठा पुरवठा करणे, उत्पादित मालाची विपणन व्यवस्था विकसित करणे, नाशवंत शेतमालाचे प्रक्रियाकृत मालामध्ये रुपांतर करणे, व कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देणे या उद्देशाने सन २०११-२०१२ पासुन राज्यात शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना करण्याची बिगर राजकीय चळवळ मोठ्या प्रमाणात चालू झाली आहे. शेतमालास योग्य दर मिळावा, शेतमाल प्रक्रिया उद्योग वाढावे व शेतमालाची एकत्रित व प्रक्रियायुक्त शेतमालाचे ब्रॅन्डनेम विकसित होऊन शेती फायदेशीर व्हावी, यासाठी सद्यस्थितीत देशात सर्वात जास्त शेतकरी उत्पादक कंपन्या महाराष्ट्रात स्थापन झालेल्या आहेत. ही संख्या सुमारे ८००० पेक्षा जास्त आहे.

राज्यात अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी लक्षणीय प्रगती केलेली आहे. परंतु अनेक संस्थांना मार्गदर्शनाच्या अभावामुळे अनेक संधी उपलब्ध असताना सुद्धा मुख्य उद्दिष्टापर्यंत त्यांना यश प्राप्त करता आलेले नाही. शासनाचा शेतकरी उत्पादक कंपनी स्थापनेचा मुख्य उद्देश, लहान व मध्यम शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी काम करणे हा आहे. शेतीतील उत्पादकता वाढवावी, शेतमालाची गुणवत्ता सुधारून उत्पादन खर्च कमी व्हावा व मध्यस्थांची साखळी कमी करून शेतमालाला योग्य भाव मिळावा, यासाठी अनेक शेतकरी उत्पादक कंपन्या काम करीत आहे. एकट्या शेतकऱ्याला हे काम करणे अवघड आहे. त्यामुळे शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून कृषी मालाच्या विपणन व्यवस्था बळकट करून, शेतकरी सभासदाच्या शेतमालाची बाजारासोबत जोडणीचे काम करण्यात येत आहे. अशा शेतकरी उत्पादक कंपनीच्या सभासदांना १० ते १५ % अतिरिक्त दर प्राप्त झालेले आहे व मध्यस्थांची साखळी कमी करण्यात मदत झालेली आहे.

शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन केल्यानंतर कंपनीची मुख्य उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून संघटीतपणे प्रयत्न केल्यास या संस्था चांगल्या प्रकारे काम करू शकतात, असे राज्यात अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी सिध्द केलेले आहे. त्यांच्या स्थापनेपासून कंपनीची वाटचाल कशी असावी याचे अचूक मार्गदर्शन नाबार्ड, महाराष्ट्र स्पर्धाक्षक विकास प्रकल्प महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ या संस्थांच्या माध्यमातून स्थापन केलेल्या शेतकरी उत्पादक कंपनींना वेळोवेळी मिळालेले आहे.

परंतु राज्यात स्थापन झालेल्या अनेक कंपन्याची संख्या लक्षात घेता अशा अनेक संस्था शास्त्रोक्त मार्गदर्शनापासून वंचित आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यांना शास्त्रोक्त मार्गदर्शनाची मोठी गरज आहे. व्यावसायिक मार्गदर्शन संस्था प्रतिनिधींना प्राप्त झाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होऊ शकते. ही गरज ओळखून व त्यासाठी पुढाकार घेऊन सक्षम व शाश्वत कंपनी चालविण्यासाठी प्रशिक्षणाची सुविधा **महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर** यांनी उपलब्ध केलेली आहे. महाज्योती हि संस्था महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय (OBC), विजाभज (VJNT), विशेष मागास प्रवर्ग (SBC) लक्षित गटातील समाजाची सामाजिक शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अनेक कृती कार्यक्रमाची अमलबजावणी करीत आहे. त्यामुळे शेतकरी केंद्र बिंदू मानून शेतकरी कंपनी, शेतकरी गट, वैयक्तिक शेतकरी या

लक्षित गटातील संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रतिनिधिक सभासद यांच्यासाठो विनाशुल्क क्षमता बांधणी पाच दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रम योजनेचीघोषणा करण्यात येत आहे.

महाज्योती संस्थेमार्फत या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे (MCDC) यांच्याशी सहकार्य करार (MoU) केलेला आहे. हे महामंडळ सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक कंपनी यांचे बळकटीकरण व सक्षमीकरणाचे राज्यात कामकाज करीत आहे. या महामंडळाकडे प्रशिक्षण राबविण्याचा अनुभव व तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध आहे.

**योजना**–

महाज्योती लक्षित गटातील (इमाव, व्हीजेएनटी, एसबीसी) शेतकरी उत्पादक कंपनी संचालक, सभासद, मुख्य कार्यकारी अधिकारी व वैयक्तिक शेतकरी यांच्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यामध्ये पाच दिवसीय निवासी प्रशिक्षणाची विनाशुल्क प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी कंपनीशी निगडीत विविध विषयतज्ञाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण साहित्य, चहा, नाश्ता, भोजन, निवास, क्षेत्रीय भेट व प्रमाणपत्र इत्यादी बाबींचा समावेश आहे.

**उद्देश** –

महाज्योती लक्षित गटातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांना व्यवसायांच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात, त्यांनी स्थापन केलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्या सक्षम व्हाव्यात, त्या शाश्वतपणे चालाव्यात, त्यामध्ये शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा व त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास हातभार लागावा या दृष्टीने ही योजना कार्यान्वित केलेली आहे

**प्रशिक्षणातील समाविष्ट विषय -**

- शेतकरी उत्पादक कंपनी किंवा शेतकरी गट यांचे आदर्श व्यवस्थापन कसे करावे.
- शेतकरी उत्पादक कंपनींना वित्त पुरवठा, वैज्ञानिक प्रतिपूर्ती, कंपनीचे वित्तीय नियोजन व व्यवसाय विकास आराखडा तयार करणे.
- कृषी माल निर्यातीमध्ये शेतकरी उत्पादक कंपनींना वाव, संधी व कार्यप्रणाली.
- शेतकरी उत्पादक कंपनींच्या माध्यमातून सभासदांना शाश्वत निविष्ठा पुरवठा.
- बाजाराची गतिशीलता समजावुन घेणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून शेतमालाची ऑनलाइन विक्री व्यवस्था निर्माण करणे.
- कृषी मालाचे विपणन, साठवणूक, प्रक्रिया, मूल्यवर्धन, मुल्यसाखळी तयार करणे.
- शेतकरी उत्पादक कंपनी सभासद विसंवाद, प्रशासन व लेखाकर्म.
- व्यवसायिक जोखीम व वित्तीय व्यवस्थापन.
- केंद्र व राज्य पुरस्कृत शेतकरी उत्पादक कंपनीसाठी विविध योजना

**योजनेच्या लाभार्थी पात्रतेचे निकष -**

- प्रशिक्षणार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- प्रशिक्षणासाठी पात्र व्यक्ती ही इमाव, व्हीजेएनटी, एसबीसी या लक्षित गटातील असावी.
- प्रशिक्षणासाठी पात्र लक्षित गटातील व्यक्ती आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय (EWS) /नॉन क्रीमिलीयर गटातील असावी. उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित उत्पन्न रु.८ लाख पेक्षा कमी असावे. याबाबत संबंधित तहसीलदार अथवा सक्षम अधिकारी यांचा उत्पन्नाचा दाखला असावा.
- अर्जदार किमान इयत्ता ८ वी उत्तीर्ण असावा.
- उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व जास्तीत जास्त ६० वर्षे असावा.
- शेतकरी हा नाबार्ड / एम. ए. सी. पी. / एमसीडीसी / स्मार्ट इत्यादी योजनेद्वारे स्थापित शेतकरी उत्पादक कंपनीचा सभासद नसावा.

- एका कंपनीतील किंवा शेतकरी गटातील जास्तीत-जास्त पाच व्यक्ती लक्षित गटातील प्रशिक्षणासाठी सहभागी होऊ शकतात.
- लक्षित गटातील जी व्यक्ती शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्यास इच्छुक आहे असे शेतकरी प्रशिक्षणासाठी आवश्यक कागदपत्राची पूर्तता केल्यास त्यांना सुद्धा प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे

**अत्याश्यक कागदपत्रे-**

- प्रशिक्षणार्थी आधारकार्ड
- प्रशिक्षणार्थी लक्षित गटातील असल्याबाबत जातीचा दाखला.
- प्रशिक्षणार्थी आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय (EWS) /नॉन क्रीमिलीयर गटातील असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचा उत्पन्नाचा दाखला.
- शेतकरी उत्पादक कंपनी किंवा शेतकरी गटातील प्रस्तावित प्रशिक्षणार्थीची संस्थेच्या लेटरहेडवर यादी व सोबत प्रशिक्षणार्थी निहाय कागदपत्रे

**अर्ज प्रक्रिया-**

प्रशिक्षणासाठी विहित नमुन्यातील ऑनलाइन अर्ज https://mahajyoti.mahamcdc.com/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातुन प्रशिक्षणासाठी ऑनलाइन अर्ज अवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा किंवा संपूर्ण कागदपत्रासह अर्ज महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर पुणे-४११००५ या पत्त्यावर पाठवावा.

**प्रशिक्षणाचे ठिकाण-**

प्रथमतः पुणे व नागपूर येथे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येईल व इतर जिल्ह्यातसुद्धा एमसीडीसी मार्फत प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करण्यात येईल.

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शेतकरी उत्पादक कंपनींना पुढील दोन वर्षे निशुल्क मार्गदर्शन महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मार्फत करण्यात येणार आहे. त्यामध्ये संबंधितांना व्यवसायिक संधी उपलब्ध करून देणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, निविष्ठा पुरवठा, मार्केट लिंकेजेस, इक्विटी ग्रॅन्ट प्रस्ताव, शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी इत्यादी सशुल्क सेवा पुरविण्यात येणार आहे.

महाज्योती संस्थेमार्फत लक्षित घटकांतील व्यक्तींसाठी समाज परिवर्तन करण्याच्या दृष्टीने विविध पातळीवर कामकाज करीत आहे. महाज्योती या संस्थेच्या लक्षित गटातील मुख्य घटक शेतकरी आहे. त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी या संकल्पनेस पाठबळ देण्याचा महाज्योती या संस्थेचा उद्देश आहे. कारण महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने स्थापन झालेली ही संस्था आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्या काळात शेतकऱ्यांचे अज्ञान, दारिद्र्य व अन्याय दूर करण्यासाठी ठोस भूमिका घेतलेली होती. त्यांनी शेतकऱ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिलेले होते. शिक्षणाशिवाय शेतकऱ्यांची प्रगती शक्य नाही असे त्यांचे मत होते. तोच वसा पुढे चालविण्याचा महाज्योती या संस्थेचा प्रयत्न आहे. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांसाठी तारणहार ठरणार असून शेतकऱ्यांना आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा देणार आहे. त्यामुळे या योजनेचा अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाज्योती संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

----------